नॅशनल इंन्स्टिटयूट ऑफ फायर इंजिनिअरिंग, वर्धा (संस्था क्र.०५७७) या संस्थेस शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून संलग्नता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्र. मान्यता-२०१४/(प्र.क्र.१३३/१४)/तांशि-५
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ०८ मार्च, २०१९.

<u>वाचा</u> :- १) शासन निर्णय क्र.मान्यता-२०१४/(प्र.क्र.१३३/१४)/तांशि-५, दिनांक ८/१२/२०१५.
२) शासन निर्णय क्र.मान्यता-२०१४/(प्र.क्र.१३३/१४)/तांशि-५, दिनांक १०/०४/२०१८.
३) संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचे क्र.मरातंशिमं/का-५०/संलग्नता/ २०१८/४८०२, दिनांक २०/०७/२०१८ रोजीचे पत्र.
४) संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचे क्र.मरातंशिमं/अभ्यासक्रम विभाग (का-५०)/५६४३, दिनांक २१/०८/२०१८ रोजीचे पत्र.
५) संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचे क्र.मरातंशिमं/का-५०/संलग्नता/ २०१८/७३९७, दिनांक १/११/२०१८ रोजीचे पत्र.
६) मा.उच्च न्यायालयाने रिट याचिका क्र.२७१/२०१६ मध्ये दिनांक २८/०७/२०१७ रोजी दिलेले अंतीम आदेश.

<u>प्रस्तावना:-</u>

संदर्भ क्र. १ येथील दिनांक ८/१२/२०१५ रोजीचे शासन निर्णयांन्वये वर्धा जिल्ह्यातील १८ संस्थांची मान्यता शासनाकडून रद्द करण्यात आलेली होती. सदर १८ संस्थांमध्ये नॅशनल इंन्स्टिटयूट ऑफ फायर इंजिनिअरिंग, वर्धा (संस्था क्र.०५७७) या संस्थेचा समावेश होता. सदर संस्थेने रिट याचिका क्र. २७१/२०१६ अन्वये महाराष्ट्र शासन व इतर यांचे विरुध्द नागपूर खंडपीठ येथे दाखल केलेल्या याचिकेच्या प्रकरणी मा.न्यायालयाने दिनांक २८/०७/२०१७ रोजीच्या दिलेल्या अंतिम आदेशानुसार विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या नामांकनाचे Online अर्ज स्विकृत करणे, परीक्षा अर्ज भरणे इत्यादी कार्यवाही विद्यार्थ्यांच्या परीक्षा सुरळीत पार पाडण्याच्या दृष्टीने संदर्भ क्र.२ येथील दिनांक १०/०४/२०१८ रोजीच्या शासन निर्णयांन्वये संस्थेला शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करीता महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाची संलग्नता बहाल करण्यात आलेली होती.

मा.उच्च न्यायालयाने त्यांचे दिनांक २८/०७/२०१७ रोजीचे अंतीम न्यायनिर्णयात नॅशनल इंन्स्टिटयूट ऑफ फायर इंजिनिअरिंग, वर्धा (संस्था क्र.०५७७) या संस्थेने दाखल केलेली याचिका क्र.२७१/२०१६ निकाली काढली असून, त्यानुसार सोनार समिती किंवा विशेष चौकशी पथकाकडून (SIT) अहवाल तीन महिन्याच्या कालावधीत प्राप्त करुन नियमानुसार पुढील कायदेशीर कार्यवाही करण्याबाबत निर्णय दिलेला आहे. मा.उच्च न्यायालयाने शासनाचा संदर्भ क्र.१ येथील दिनांक ८/१२/२०१५ रोजीचा शासन निर्णय रद्दबातल ठरविला आहे.

तसेच महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाचे वकील ॲड प्रतीक आर. पुरी यांनी मंडळास सादर केलेल्या दिनांक २/६/२०१८ रोजीच्या पत्रांन्वये मा.उच्च न्यायालयाने याचिका क्र.२७१/२०१६ प्रकरणी त्यांचे दिनांक २८/०७/२०१७ रोजीच्या न्यायनिर्णयांन्वये शासनाचा दिनांक ८/१२/२०१५ रोजीचा शासन निर्णय रद्दबातल ठरविला असल्याने, संस्थेला महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाची संलग्नता देण्यास हरकत नसावी असे मत व्यक्त केले आहे.

त्यास अनुसरून प्रस्तुत प्रकरणी मा.उच्च न्यायालयाचे निर्देश विचारात घेता नॅशनल इंन्स्टिटयूट ऑफ फायर इंजिनिअरिंग, वर्धा (संस्था क्र.०५७७) या संस्थेला संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांनी प्रस्तावीत केल्यानुसार शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून संलग्नता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

प्रस्तावनेमध्ये नमूद केलेल्या बाबी विचारात घेता, नॅशनल इंन्स्टिटयूट ऑफ फायर इंजिनिअरिंग, वर्धा (संस्था क्र.०५७७) या संस्थेच्या प्रकरणी मा.उच्च न्यायालयाच्या अंतिम न्यायनिर्णयाच्या परिच्छेद ६ मध्ये नमूद केलेली वस्तुस्थिती विचारात घेता, संस्थेतील शैक्षणिक वर्ष २०१८-१९ च्या प्रवेशार्थी विद्यार्थ्यांचे नामांकनाचे Online अर्ज स्विकृत करणे, परीक्षा अर्ज भरणे इत्यादी कार्यवाही विद्यार्थ्यांच्या परीक्षा सुरळीत पार पाडण्याच्या दृष्टीने तसेच संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ यांनी प्रस्तावीत केल्यानुसार शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाची संलग्नता देण्यात यावी.

२. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांनी त्याअनुषंगाने पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०३०८१५०६०६९६०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Anil Raghunath Katkar

Digitally signed by Anil Raghunath Katkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher and Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c3fec0b0f5c05dc9058175992109e62d3f5719b9dfb87a96579dc30c265d67ce, serialNumber=2356d82c73e8a0c7b6da68b6511197206b94720842cda576febebf84581fc52a, cn=Anil Raghunath Katkar
Date: 2019.03.08 15:09:28 +05'30'

(अ. र. काटकर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति:-

१. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,

२. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, वांद्रे (पुर्व), मुंबई,

३. संबंधित संस्था (महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेमार्फत),

४. निवड नस्ती / तांशि-५.